# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि.

**दिनांक:28.08.2026** **वार:शुक्रवार**

---

1. विकसित भारताकरता आधुनिक क्रीडा व्यवस्था उभारण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. गणेशोत्सामध्ये मंडळांनी प्रसादाची शुद्धता जपावी; मुख्यमंत्र्यांची सूचना
3. मराठी शिकण्यासाठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांना वर्षभराची मुदतवाढ
4. कोलंबो क्रिकेट कसोटी सामना अनिर्णित; मालिकेत भारताचा 1-0 असा विजय आणि
5. नेपाळमधील पूरस्थिती गंभीर, मृतांची संख्या 389वर; मदत आणि बचावकार्य युध्दपातळीवर सुरु

**मोदी**

21व्या शतकातील भारतासाठी आधुनिक क्रीडा व्यवस्था उभारण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. खेलो इंडिया संवाद कार्यक्रमात ते काल दूरदृश्य प्रणालीद्वारे बोलत होते. क्रीडा क्षेत्र हे केवळ पदकं जिंकण्यापुरतं मर्यादित नसल्याचं सांगत ते म्हणाले...

**जब मैं स्पोर्ट्स की बात करता हूं, तो ये केवल मैडल जीतने तक सीमित नही है। ये विकसित भारत के निर्माण में भारत की खेल शक्ति और भारत की युवा शक्ति को एक साथ जोडने का अभियान है। मैं हमेशा कहता आया हूं जो खेलें वो खिलें और खेलें में खेलना सिर्फ मैदान पर जीतना नही है खेल में खेलना का मतलब व्यक्ति का खिलना और देश का गौरव बढाना है।**

प्रत्येक जिल्ह्यात जागतिक क्रीडा नकाशावर चमकण्याची क्षमता असल्याचंही मोदी म्हणाले. पंतप्रधानांनी काल देशभरातील ठिकठिकाणच्या तरुणांशी आणि खेळाडूंशी संवाद साधला.

हॉकीचे महान खेळाडू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी 29 ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जातो. या उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी काल मार्गदर्शन केलं. देशभरातील प्रत्येक जिल्ह्यातील दोन महाविद्यालयांमध्ये युवकांच्या सहभागातून 'खेलो इंडिया संवाद' आयोजित करण्यात आला.

**मोदी**

पुण्यातील खडकी शिक्षण संस्थेचं टी. जे. महाविद्यालय तसंच अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठात देखील या कार्यक्रमाचं काल आयोजन करण्यात आलं होतं. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी आणि उपस्थितांनी 'नशामुक्ती'ची सामूहिक शपथ घेतली. या कार्यक्रमाविषयी बोलतांना माजी खेळाडू आणि पुण्यातील व्हेलॉसिटर बॅडमिंटन अकादमीमधील प्रशिक्षक प्रसाद गिते म्हणाले....

**खेळ हा फक्त मेडल किंवा जिंकण्यापुरता मर्यादित नसतो खेळ आपल्याला शिस्त मेहनत संयम आणि सातत्य शिकवतो. आज आपल्या देशात खेळायला खूप मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन आणि प्राधान्य मिळत आहे.**

**पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी अनेक वेळा खेळाकडे केवळ एक्स्ट्रा करिक्युलर एक्टिव्हिटी म्हणून न पाहता एक करियर ऑप्शन म्हणून पाहण्याचा आवाहन केलं आहे. ही विचारसरणी आजच्या युवा पिढीसाठी खूप महत्त्वाची आहे. आजच्या डिजिटल युगात मुलांनी मोबाईल आणि स्क्रीनपासून दूर जाऊन मैदानावर वेळ घालवणं गरजेचं आहे. खेळाडू म्हणून मी अनेक चढ अनुभवले आहेत आणि आज एक कोच म्हणून नवीन पिढीला घडवण्याची संधी मिळते ही माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.**

रिदमिक्स जिमनॅस्टिकमधील महाराष्ट्राची आंतरराष्ट्रीय खेळाडू किमया कार्ले हीनं आपल्या भावना व्यक्त केल्या...

**आज जो खेलो इंडिया युवा संवाद का प्रोग्राम हुआ उसमें मेरे जैसे सभी खिलाड़ियों को आदरणीय प्रधानमंत्री मोदी जी ने बहुत प्रोत्साहन दिया | भारत के स्पोर्ट्स इको सिस्टम में अधिक प्रगति हो रही है | खेलो इंडिया और टॉप स्कीम जैसे इनिशिएटिव्स इनसे मैं उम्मीद करती हूँ कि भविष्य में हम भारत का नाम सभी स्पोर्ट्स में रोशन करें |**

## गणेशोत्सव-मुख्यमंत्री/उपमुख्यमंत्री

आगामी सार्वजनिक गणेशोत्सामध्ये गणेश मंडळांनी भाविकांना वाटण्यात येणार्या प्रसादाची शुद्धता जपावी. तसंच अन्न आणि औषध प्रशासनाच्या नियमांचं काटेकोर पालन करावं, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. उत्सव काळातील कायदा आणि सुव्यवस्थेसंदर्भात काल मुंबईत आयोजित बैठकीत ते बोलत होते. फटाके तसंच लाऊडस्पिकरच्या वापरात होणाऱ्या नियमभंगाच्या प्रकारांवर पोलिसांनी लक्ष ठेवून संबंधितांवर कठोर कारवाई करावी. गणेशोत्सवाचं पावित्र्य आणि शिस्त कायम राखणं ही सामूहिक जबाबदारी आहे. असंही मुख्यमंत्री म्हणाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री

व्यावहारिक मराठी शिकण्यासाठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांना वर्षभराची मुदतवाढ देत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणंवीस यांनी काल दिली. या कालावधीत या चालकांवर कोणतीही कारवाई करण्यात येणार नसल्याचं आश्वासन यावेळी देण्यात आलं. रिक्षा आणि टॅक्सीचालक संघटनेच्या प्रतिनिधींनी काल मुंबईत मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. मराठी भाषा शिकण्यासाठी आपले प्रयत्न सुरु असल्याचं त्यांनी सांगितलं.

## रक्षाबंधन

बहिन भावाचं पवित्र नातं जपणारा राखी पौर्णिमेचा सण आज सर्वत्र साजरा होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राखी पौर्णिमेनिमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. हा सण भाऊ-बहीणीच्या ऋणानुबंधाबरोबरच भावंडं, मित्रपरिवार आणि समाज यांच्यातील जिव्हाळा, आदर आणि परस्पर जबाबदारीच्या भावनेचे प्रतीक आहे. असं त्यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

## नारळी पौर्णिमा

श्रावण पौर्णिमा म्हणजेच नारळी पौर्णिमेचा सण काल कोळी बांधवांनी मोठ्या उत्साहात साजरा केला. पावसाळ्यामुळे मासेमारी बंद करुन बंदरात नांगर टाकून असलेल्या बोटी कालच्या दिवशी पुन्हा समुद्रात मार्गक्रमण करतात. त्यामुळे या दिवसाला खूप महत्त्व आहे. यावेळी पारंपरिक पद्धतीनं समुद्राला नारळ अर्पण करुन, प्रार्थना करण्यात आली.

**सुनेत्रा पवार**

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी इथं अल्पवयीन बालिकेवर अत्याचार आणि हत्येची घटना नुकतीच घडली होती; या घटनेतील पीडितेच्या कुटुंबियांची उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी काल भेट घेतली. या प्रकरणातील दोषींना कठोर शिक्षा मिळावी, यासाठी खटला जलदगती न्यायालयात चालवण्यात येईल, अशी ग्वाही पवार यांनी दिली.

**मानवाधिकार आयोग**

अमरावती इथं नुकत्याच रुग्णालयाला आग लागून तीन अर्भकांचा मृत्यू झाल्याच्या घटनेची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगनं स्वतःहून दखल घेतली असून, राज्याच्या मुख्य सचिवांना नोटीस जारी केली आहे. येत्या दोन आठवड्यात या दुर्घटनेबद्दलचा अहवाल सादर करावा असे निर्देश आयोगानं दिले आहेत.

**आंदोलन- नंदुरबार**

नंदुरबार जिल्ह्यात शहादा इथल्या आदिवासी विकास विभागाच्या वसतिगृहांमधल्या पाणी प्रश्नावरून संतप्त विद्यार्थ्यांनी काल रात्री रस्त्यावर उतरून ठिय्या आंदोलन केलं. गेल्या दोन तीन वर्षांपासून वसतिगृहात पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्याची विद्यार्थ्यांची तक्रार आहे.

**विठ्ठलराव विखे-पाटील-अहिल्यानगर**

सहकार चळवळीचे जनक पद्मश्री डॉक्टर विठ्ठलराव विखे-पाटील यांच्या जयंती दिनानिमित्त दिल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय पुरस्कारांचं वितरण काल अहिल्यानगर इथं झालं. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार 99व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांच्या हस्ते मान्यवरांना गौरवण्यात आलं. ज्येष्ठ लेखक संपादक उत्तम कांबळे यांना यावेळी जीवन गौरव पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

**महाजनजागृती-रत्नागिरी**

सायबर गुन्ह्यांचं प्रमाण शून्यावर आणण्यासाठी रत्नागिरी जिल्ह्यात एकाच दिवशी सर्व ग्रामपंचायतींमध्ये महाजनजागृती मोहीम राबवली जाणार आहे. जिल्ह्यातल्या 849 ग्रामपंचायतीमध्ये पुढील महिन्यात ही मोहीम राबवली जाईल अशी माहिती पालकमंत्री उदय सामंत काल रत्नागिरीमध्ये एका बैठकीत दिली.

**क्रिकेट**

कोलंबो क्रिकेट कसोटी सामना काल अनिर्णित राहिला. प्रथम फलंदाजी करताना भारतानं 9 बाद 503 धावांवर डाव घोषित केला होता. त्यानंतर भारतानं पहिल्या डावात 213 धावांची आघाडी घेतली. त्यानंतर भारतानं श्रीलंकेला फॉलोऑन दिला होता. काल सामन्याच्या शेवटच्या दिवशी श्रीलंकेनं दमदार खेळी करत 9 बाद 429 धावांपर्यंत मजल मारली. या मालिकेतला पहिला सामना भारतानं जिंकला असल्यानं ही मालिका भारतानं 1-0 अशी जिंकली आहे.

**नेपाळ पूर**

नेपाळमध्ये अचानक आलेल्या महापुराच्या दुर्घटनेतील मृतांची संख्या 389 वर पोहोचली असून, 290 भारतीयांसह हजारो बेपत्ता लोकांचा शोध घेण्यासाठी मदत आणि बचावपथकाचे शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. तिथे अडकलेल्या भारतीय नागरिकांचा शोध घेण्याचे आणि त्यांची सुटका करण्याचे प्रयत्न भारतीय प्रशासनानं तीव्र केले आहेत. आतापर्यंत या तिबेट आणि नेपाळमधील प्रशासनाने 1500 हून अधिक लोक बेपत्ता असल्याची माहिती दिली असून, त्यापैकी अनेकजण परदेशी नागरिक आहेत. परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, नेपाळमध्ये आतापर्यंत 84 भारतीय नागरिकांची सुटका करण्यात आली आहे. पूरग्रस्त भागातली दूरसंचार व्यवस्था अद्याप विस्कळीत असून

नेपाळला गेलेल्या 288 भारतीयांशी संपर्क होत नसल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी दिली.

दरम्यान, नेपाळमधे महाराष्ट्रातले 114 पर्यटक अडकले असून त्यापैकी 53 जण सुरक्षित असल्याची माहिती मिळाल्याचं राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने काठमांडू-जनकपूर प्रवासासाठी चार मिनी बसची व्यवस्था करण्यात आली असून 106 प्रवासी काठमांडूहून जनकपूरच्या दिशेने रवाना झाले आहेत. हे प्रवासी आज सकाळी जनकपूरमार्गे भारत-नेपाळ सीमेवर पोहोचणार असून आहेत.

**गिरीश महाजन**

नेपाळमधे अडकलेल्या राज्यातल्या पर्यटकांचा शोध घेण्यासाठी राज्यशासन केंद्र सरकारच्या संपर्कात असल्याची माहिती राज्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली. ते काल नाशिक इथं वार्ताहरांशी बोलत होते.

**हवामान**

कोकण आणि लगतच्या मध्यपूर्व अरबी समुद्रावर एक चक्रिय स्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर कोकणात तुरळक तुरळक ठिकाणी तर राज्यात काही भागात पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.